
## प्रकरण ५

# मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा

# मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा

प्रज्ञा लोखंडे



## प्रकरण ५

# मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा :

मराठी काव्यवाङ्मयाच्या प्रातांत १९८० नंतरच्या पिढीतील प्रज्ञा लोखंडे ह्या एक दमदार लेखन करणाऱ्या कवयित्री आहेत. त्यांच्या 'अंतःस्थ' १९९३ आणि 'उत्कट जीवघेण्या धगीवर' या दोन कवितासंग्रहांनंतर त्यांचा 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' २००७ प्रकाशित झाला आहे. मागील प्रकरणमध्ये जीवघेण्या धगीवर या काव्यसंग्रहाचा चिकित्सक अभ्यास केला आहे. या काव्यसंग्रहातून स्त्रीच्या वाटयाला येणारे पारंपारिक जग,दु:ख आणि खिडकीबाहेरुन दिसणाऱ्या नव्या जगाची स्त्रीला असणारी आंकांक्षा यांचे चित्रण येते. पारंपारिक जग आणि नवे जग यांमधील ताण, प्रत्ययास येणारी परात्मता, घुसमट, दिवसेंदिवस फोल होत जाणारे प्रेमसंबंधातले नातेसंबंध, त्यातून होणारा भ्रमनिरास आणि त्यातूनच पुढे निखळ स्वरुपात स्त्रीवादी अनुभवांकडे होत जाणारा कवयित्रीचा प्रवास यांचे मार्मिक चित्रण आले आहे. अशी आशयसुत्रे व्यक्त करुन आणि स्वसमाजातील व्यक्तींना मिथकांच्या रुपात आणून नवीन शब्दकळा आणि ओघवती शैली यांद्वारे आपल्या कवितेचे एक वेगळे वळण प्रज्ञा लोखंडे यांनी 'उत्कट जीवघेण्या धगींवर' या काव्यसंग्रहातून सूचित केले आहे.

प्रज्ञा लोखंडे यांच्या विकसनशील विचारसरणीतून साकारलेले कवितेचे अनोखे आणि निश्चित असे स्वरुप 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' या काव्यसंग्रहातून पहावयास मिळते. स्त्री सन्मानाचा पुरस्कार करणारी कविता यात आहे. प्रज्ञा लोखंडे यांनी या काव्यसंग्रहातून पुराणकाळापासून ते आत्ताच्या पोस्ट मॉडर्नीझम पर्यंतच्या स्त्री प्रश्नांना प्रकट करण्याचा प्रयत्न केला आहे. मानवी नातेसंबंधातली बेगडी, संकुचित वास्तवता यातून व्यक्त केली आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका मोठया समूहाला जमातवादाच्या सांस्कृतिक कुरघोडीतून बाहेर काढून, त्यांचे पशूत्व नष्ट करुन मानवीपण बहाल केले. या सम्यक परिवर्तनाच्या प्रवाहाचं आशयसूत्र या काव्यसंग्रहातून प्रज्ञा लोखंडे यांनी साकारलं आहे. याआधीची त्यांची कविता ही भूक आणि क्षुधा, तहान आणि तृष्णा या साध्या सोप्या नसलेल्या भेदातून वाट काढणारी आहे. परंतु या काव्यसंग्रहातून कवयित्री प्रज्ञा लोखंडे हा भेद समष्टीच्या व्यापकतेला केंद्रबिंदू मानून समग्राशी डोळा भिडवू पाहण्याची हिंमत व्यक्त करतात.

## अ) स्त्री सन्मानाचा पुरस्कार :

कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांची कविता समकालीन मराठी कवयित्रींच्या स्त्री विषयक भावविश्वाला फाटा देऊ पाहते. संपूर्ण स्त्री सन्मानाचा पुरस्कार करणारी अशी त्यांची कविता आहे.

" मलाही व्हायचं आहे

प्रकृती

मलाही लिहायची आहे

थेरीगाथा.... "

( पृ. १)

असं म्हणणाऱ्या प्रज्ञा लोखंडे यांची कविता अतिशय सर्जशील विचारप्रणालीची आहे. 'प्रत्येकीत असतं एक प्रियदर्शित्व' या कवितेतून कवयित्री म्हणते

"हे असं क्षणाची पत्नी

आणि

अनंतकाळची माता वगैरे असण्यापेक्षा

स्त्रीने अनंतकाळी माणूसच असावं"

(पृ.१०)

अशा माणूसपणाच्या हक्काची मागणी प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या कवितेतून केली आहे. 'स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता आहे. हे (डायलॉग) सुभाषित किंवा सुविचार म्हणून मराठी समाजाने स्वीकारला. आचार्य अत्रे यांनी तो मांडला. त्यावर सभा संमेलनात आणि विविध साहित्यामध्ये भाष्य केले जाते. 'न' विचाराने आम्हास असे स्वीकारण्याची सवय झाली आहे. प्रज्ञा लोखंडे यांनी या सुविचाराचा मर्मभेद केला आहे. पुराणकाळपासून सून आत्ताच्या ग्लोबलायझेशन पर्यंतच्या काळात दरवेळी स्त्रीला गृहीत धरलं गेलं. सहजीवन, संभोग, समभाव, समानता, स्वातंत्र्य अशा सहसंयोगातून स्त्रीचं व्यक्तित्व माणूसपण दडपून टाकण्यात आलं आहे म्हणूनच मग ती एक गृहिणी,

एक माता, एक पत्नी अशा विविध नात्यांच्या जोखडातून स्त्रीला मुक्त करुन स्त्रीला अनंतकाळी माणूस पणाचीच वागणूक मिळावी असे कवयित्रीला वाटते.

कवयित्री म्हणते की स्त्रीला आता मुक्त केलंच पाहिजे. वर्षानुवर्ष आपण सोयीस्करपणे प्रत्येक स्त्रीला आईपणाच्या चौकटीत अडकऊन ठेवलं आहे. तिला आईपणाचं भिंग बदलून पाहिलं पाहिजे. आणि आता तिला आईपणाच्या चौकटीतून बाहेर काढूया असं कवयित्री म्हणते.

"आई

पृथ्वी तलावरची सरळसोट सहजसुंदर

आदिम गोष्ट ....

गोष्ट रचली गेली,

गोष्ट रचली गेली

नि एकदम मिथकात बंद झाली!"

( पृ.२)

प्रज्ञा लोखंडे म्हणतात की, आईला आदिम काळापासून एकाच चेहऱ्याची करुन टाकली आहे. तिची एकजिनसी प्रतिमा आणि एकसाची एकच एक कविता कोरुन ठेवत कायम आईला 'प्रेमस्वरुप वात्सल्यसिंधू' च ठेवण्यात आलंय. त्यामुळे आता तरी तिला माणूसपण बहाल केलेच पाहिजे. तिच्या दु:खांना-वेदनांना समजाऊन घेतलंच पाहिजे असे कवयित्रीला वाटते. कारण विश्वाच्या उत्पत्तीचं रहस्य जाणणारी ती एकमेवच माणूस आहे. कवयित्री पुढे म्हणते

" खरं तर, प्रत्येक आई कोरत जाते

आपल्या त्वचेवर

आपल्या अवकाशावर

स्वत:चं लखलखीत अस्तित्व

बाईपासून आईपर्यंत

आईपासून माणूस असण्यापर्यंत

न् आपण ठार अशिक्षित होत जातो.

तिची लिपी वाचता वाचता."

(आपण आता तिला काढूया.. पृ.३)

कवयित्री प्रज्ञा लोखंडे म्हणतात की करुणेच्या सार्वत्रिक परिभाषेला ओळखू शकणारी एक अनामिक ग्रंथी सतत स्त्रीमध्ये स्त्रवत असते. त्यामुळेच विश्वाचे रहस्य कळल्यानंतरसुध्दा बाई जगतच असते. कवयित्री 'वेश्या' या कवितेतून म्हणते की विश्वाचं आणि संपूर्ण पुरुषजातीचं रहस्य समजून घेणारी ती एकमेव स्त्री असते. एक उदात्त हास्य तरळतं तिच्या स्वच्छ गहन डोळयांत तेव्हा कवयित्री म्हणते की

"स्पर्शाच्या करोडो तऱ्हा

ज्ञात असलेली बाई

बाईच असत नाही

सदासर्वकाळ....."

(वेश्या पृ. ४)

याही कवितेतून म्हटले आहे की बाई असण्याचे दु:ख नाही. पण पुरातन काळापासून तिचे बाईपण गोठऊन टाकले आहे. म्हणूनच आता सदासर्वकाळ बाई न उरता कायमच माणूस म्हणून जगले पाहिजे. असे कवयित्रीचे मत आहे.

कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी 'मोनालिसा' या कवितेतूनही बाईने 'आपलं चिरंतन हसू जपलं पाहिजे 'असे म्हटले आहे. प्रज्ञा लोखंडे म्हणतात अभिजात, गूढ, अस्फूट हसू अनेक वर्षे जपणाऱ्या मोनालिसाचं मोनालिसापण मी कधीपासून प्रत्येक बाईत शोधते कारण.

"ती म्हणजे भ्रम

ती म्हणजे माया

ती म्हणजे बाईच्या चेहऱ्यावर

नसलेली तद्‌दन उदात्त छाया."

(मोनालिसा पृ.७)

मोनालिसान लिओनार्दोला ओतप्रोत सुखावले असले तरी त्यांच्या पुरातन कॅनव्हासला मोनालिसा पुरुषी चकवा देऊन जाते असं कवयित्रीला वाटते.

आपल्या सामजव्यवस्थेनं कायमच बाईला फक्त बाईपणाच्या स्वरुपाच पाहिलं आहे. कवयित्रीला हे मान्य नाही आता आत्मभान जागं झाल्यावर कवयित्री म्हणते तहानभुकेन स्त्रीत्व कवयित्रीला दिसते आहे. कवयित्री म्हणते.

"माझा रोजचा यातायातीचा दिवसा असतो

नव्या अंतर्ज्ञानाचा

बाईपणाच्या निरभ्र उगमात

अंतिम सत्याचा

दावा न करणारा प्रागैतिहासिक"

(बाईपणाच्या निरभ्र उगमात पृ. १७)

कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी या काव्यसंग्रहातून बाई असण्याच्या नितांत पुरातन वेदनेला प्रकट केले आहे. तसे करताना त्या बाईपणाची उणीव भासू न देता उलट स्त्री सन्मानाचा पुरस्कारच करु पाहतात. स्त्रीचं जीवन अत्यंत पारदर्शी आणि स्वाभिमानी आहे. असायला पाहिजे असे कवयित्रीचे म्हणणे आहे.

"कवयित्रीला आवडतं, मातीसारखं थेट असणं!

कवयित्रीला आवडतं, हवेसारखं मिसळून जाणं!

कवयित्रीला आवडतं, भूक लागल्यावर

भाकरीच्याही वर उठणं!"

(डोळे म्हणजेच डवरलेले पृ.१८)

अशाप्रकारे कवयित्री प्रज्ञा लोखंडे या स्त्रीला बाईपणाच्या चौकटीतून मुक्त करु पाहतात. स्त्रीला सन्मान देणारी कविता संवेदनशील पणे माणूसपणाचा हक्क मागणारी आहे.

## निष्कर्षः

१. प्रज्ञा लोखंडे यांच्या विकसनशील विचारसरणीतून साकारलेले कवितेचे अनोखे व निश्चित स्वरुप या काव्यसंग्रहातून पहावयास मिळते.
२. प्रज्ञा लोखंडे यांची कविता समकालीन मराठी कवयित्रींच्या स्त्रीविषयक भावविश्वाला फाटा देऊन नव्यानेच स्त्रीसंबंधीच्या संकल्पना रुजवताना दिसते.
३. संपूर्णपणे स्त्री सन्मानाचा पुरस्कार करणारी अशी ही कविता आहे.
४. पुराणकाळापासून दडपून टाकण्यात आलेल्या स्त्रीसाठी माणूसपणाच्या हक्काची मागणी या कवितेतून केली आहे.

## ब) स्त्रीमुक्तीचं प्रतिनिधीत्व करणारी कविता :

'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' या प्रज्ञा लोखंडे यांच्या काव्यसंग्रहातून पुराणकाळापासून ते आत्ताच्या पोस्ट मॉडर्नच्या समाजव्यवस्थेतील स्त्री प्रश्नांना कवेत घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतील स्त्री स्वतःचे असे अवकाश शोधण्यासाठी निघालेली आहे. स्वमुक्तीसाठी ही स्त्री धर्म, राष्ट्र, इतिहास आणि संस्कृतीने लादलेले दुय्यमत्व नाकारुन 'स्व'शोधनासाठी निघालेली दिसते. 'अनंतकाळी आंतर्बाहय माणूसच' असावं हे सूत्र प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेने स्वीकारलेले दिसते. स्त्रीत्वाच्या उपरेपणातून आलेली विफलता आणि त्यातून तिच्या मनाची होणारी उद्ध्वस्तता याचे प्रज्ञा लोखंडे यांनी सखोल चिंतन केलेले दिसते. प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतील स्त्रीला उपेक्षा सहन करावी लागते. दुखऱ्या वेदनांना आयुष्यभर वागवावे लागते. पण तरीही त्यांची कविता स्त्रीला या दुःखमुळया उखडून फेकण्याचं सामर्थ्य देते. समकालीन कवयित्रींच्या भावविश्वाला फाटा देऊन शतकाचं स्त्रीदुःख उजागर करणारी प्रज्ञा लोखंडे यांची कविता आहे.

स्त्रीमुक्तीसाठी प्रयत्न करताना प्रथम स्त्रीचे सर्वांगीण शोषण करणाऱ्या पुरुषप्रधान अधिसत्तेचे स्वरुप उघडे करण्याचे कार्य या कवितेतेन घडते. पुरुषसत्ताक अधिसत्तेने शतकानुशतके स्त्रीचे मानसिक– भावनिक– शारिरीक– ज्ञानार्जन या सर्वच बाबतीत शोषण केलेले आहे. याची उद्रेकी जाणीव या काव्यसंग्रहातून प्रज्ञा लोखंडे यांनी व्यक्त केली आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या प्रदीर्घ काळामध्ये ही स्त्री शोषणची जाणीव कवयित्रींने अत्यंत तीव्रपणे व्यक्त केली आहे.

"का आणला जातोय आड
अजूनही माझा स्त्री देहाकार?
योनीचं राजकारण करणाऱ्या
धर्मशास्त्रातल्या ध्वन्यर्थाचा"

इसवी सनपूर्व काळापासून आजच्या मॉडर्न जगापर्यंत जगण्याच्या वेगवेगळया व्यवस्थामध्ये स्त्रीच्या देहालाच प्राधान्य दिले गेले आहे. याची दुखरी जाणीव या कवितेचे आशयसुत्र बनते.

आपल्या संस्कृतीने सामाजिक आणि धार्मिक दोन्ही स्तरांवर स्त्रीला दुय्यमच ठेवले आहे. पुरुष प्रधानतेशी तिला आयुष्य जुळऊन घ्यावे लागते. याबाबतीत सीमॉं द बोव्हा म्हणतात, 'She is not born but rather becomes a woman' म्हणजे कुणी बाई म्हणून जन्माला येत नाही पण नंतर तिला बाई बनवण्यात येते. प्रज्ञा लोखंडे म्हणतात की,

" खरं तर तू आहेस

हाडामांसांची जिवंत संकल्पना....."

"आपण आता तिला काढूया बाहेर आईपणाच्या चौकटीतून" या कवितेत कवयित्री गावकुसाबाहेरच्या आईपासून, ब्राम्हण, खिश्चन, मुस्लिम, ओ.बी.सी. , शहाण्णवकुळी, रस्ता झाडणारी तसेच वेश्यापण लादलेली, बारबाला, मैला वाहणारी, भटक्या विमुक्तापर्यंतचं आईपण करते. पण पुढे असेही म्हणते कधीच विमुक्त नव्हतं तिचं आईपण. ती शतकानुशतंक बिनचेहऱ्याची एकसाची एकजिनसीच राहिली आहे. कायमस्वरुपी पुरुष प्रधानतेची सोयीस्कर वात्सल्यसिंधू आईच राहिली असं कवयित्री म्हणते. म्हणूनच आता स्त्रीला अशा आईपणाच्या चौकटीतून बाहेर काढले पाहिजे असे कवयित्रीचे मत आहे कारण फक्त आईच आपल्या आयुष्यावर स्वतःचं अवकाश कोरत जाते. नुसती बाई म्हणूनच नाही तर बाईपासून आईपर्यंत आणि आईपासून माणूस असण्यापर्यंतच्या स्त्रीला, पारंपारिक आईपणाचं भिंग बदलून अपारंपारिक आईकडे पहावे लागेल असं कवयित्री म्हणते.

पुरुषसत्ताक व्यवस्था स्त्रीला प्राणांतिक वेदना देत राहते. असे कवयित्रीला वाटते. पण तरीही तमामपुरुष जातीचं आणि विश्वाचं रहस्य उमगल्यानंतरही ती स्त्री जगतच राहते. करुणेच्या सार्वत्रिक परिभाषेला ती ओळखू शकते. कारण तिच्या इतकं दुःख क्वचित कुणी पाहिलं असेल. त्यामुळेच

"तिच्या पसरलेल्या । मांडयांमधल्या

पुरातनं जिवंत ठणक्यांचं उत्तर

देऊ पाहतेय हरएक जाहिरनामा"

(वेश्या पृ.४)

असे कवयित्रीला वाटते. विश्वाचं रहस्य कळलेली स्त्री ही वेश्या आहे. शरीरात घुसणाऱ्या कोडग्या ाशरीरांना ती माणूसच समजते. कारण तिच्यात एक अस्खलित प्रियदर्शित्व असतं असं प्रज्ञा लोखंडे म्हणतात. परंतु पुरुषप्रधान संस्कृतीने लादलेल्या वेश्यापणमुळे तिच्या अस्तित्वाला भलंमोठं भगदाड पडलं आहे. कारण तीही एक माणूसच आहे. कवयित्री म्हणते

" स्पर्शाच्या करोडो तऱ्हा
ज्ञात असलेली बाई
बाईच असत नाही
सदासर्वकाळ"

(वेश्या पृ. ४)

उदात्त स्वच्छ हसू तिच्या डोळयात तरळल्यावर कवयित्रीला वाटतं की विश्वातल्या प्रत्येक बाईचे डोळे असेच असावेत. या वेश्येसारखे साऱ्या विश्वाचे रहस्य कळल्यासारखे. निदान त्यामुळे तरी स्त्री स्वतःला मुक्त समजू शकेल. असे कवयित्रीला वाटते.

स्त्रीमुक्तीचं प्रतिनिधित्व प्रज्ञा लोखंडे यांची कविता करताना दिसते. स्वतःचं हाडामांसाचे झेंडे बनून निघालेल्या बायका निःशब्दपणे एकाच दिशेने चालू लागतात. स्वत्वाच्या, स्त्रीत्वाच्या, अस्तित्वाच्या लढाईत सर्व बायका कसलीही घोषणाबाजी करत नाहीत. त्यांच्या डोळयांतील हिंस्त्र शांतता कोणत्याही वेळी आक्रमक होईल असे कवयित्रीला वाटते. स्वमुक्तीसाठी कसलाही आकोश न करता स्वतःला फॅटसीज्च्या दलदलीतून, धर्म–राष्ट्र–इतिहास सभ्यता आणि संस्कृतीमधून त्यांनी स्वतःला उपसून काढले आहे. असे कवयित्रीला वाटते.

प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतील स्त्रीला तथाकथित संस्कृतीच्या पडदयातून बाहेर येऊन अवघ्या बाईपणाचाचं गुंता नीट समजून घेण्याची व तो इथल्या पुरुषसत्ताक व्यवस्थांना नीट समजाऊन देण्याची आकांक्षा आहे. परंपरेनं आजपर्यत निर्माण केलेली स्त्री प्रतिमा, मिथके, प्रतिमाने किंवा ज्या भाषेवर, लिपीवरही धर्मसत्तेचा, पुरुषसत्ताक व्यवस्थेचा पगडा आहे वर्चस्व आहे. ती लिपी ती भाषाच

नाकारुन नवी शब्दसृष्टी नवे भाषावैभव आणि नवीनच मिथके प्रतीके घडवण्याचा कवयित्री एकप्रकारचा लढाऊ पवित्रा घेते.

" तिने फाडून टाकलं
पुरुषी अधिसत्तेने फडफडणारं
शब्दकोषाचं एकेक पान
तिने नाकारली उतरंडीची
जन्मजात मिरांसदारी
तिने जिवापाड जपले
शब्दकोषातले शेष अस्खलित शब्द
काळजाच्या कुपीत...
आता तिला घडवायचे होते.
नवे शब्द, नवी भाषा, नवी मिथक नवी प्रतीकं"

(तरण्याताठया साक्षात्करात..पृ.८,९)

कवयित्री म्हणते की अशी प्रतिसृष्टी उभारायला निघालेल्या मुलीला तद्दन जुन्या पुरुषाला पर्याय सापडला नाही. एवढा या पुरुषसत्ताक व्यवस्थेचा समाजावर प्रभाव पडला आहे.

'दार उघड बये दार' या कवितेतून प्रज्ञा लोखंडे म्हणतात

" पौरुषेय अंधार
चुरडून बसलेल्या
शोकाग्रस्त बायका
एकाएकी उठून चालू लागल्या

संहितेबाहेरच्या फटफटीत प्रकाशाकडे "

(पृ.१३)

अशा या बायका प्रकाशाच्या दिशेने जात असतानाच भोवतालच्या मूलतत्त्ववादी जाणिवेतून उफाळणाऱ्या, काळवंडणाऱ्या प्रवृत्ती कवयित्रीला अस्वस्थ करुन सोडतात. तेव्हा कवयित्री या दिशाहीन भरकटणाऱ्या वास्तवाशी संघर्ष करताना दिसते. म्हणजे कवयित्री म्हणते की जगण्याच्या एका स्वतंत्र मार्गावरुन चालत असताना सभोवती घडणाऱ्या घटनांमधून ती स्वतःला वेगळं काढू शकत नाही. कवयित्री बुध्दाला उद्देशून म्हणते की, तुझ्याइतकांशाश्वत प्रगाढ बुध्दस्मित पृथ्वीवरच्या कुठल्याही जातीच्या, धर्माच्या, वर्गाच्या, रंगाच्या, कातडीच्या बाईच्या चेहऱ्यावर असायला हवं होतं. कवयित्री म्हणते की बायका आता स्वस्थितीचे भान लिहू लागल्या आहेत.

" रक्ताची झालीये तप्त शाई, काळीभोर

पण कधी लागणारेय आग,

निव्वळ आग, जमिनीवरच्या

हरएक प्रस्थापित अंतिम विधानाला ?"

(बुध्दस्मित, पृ.११ )

एक नवी सृष्टी निर्माण करताना स्त्री पर्यायी इतिहासाची निर्मिती करु पहाते. सहजीवन, समभाव, स्वातंत्र्य, पारस्वारिकता, पारदर्शकता, तीळतीळ तुटणं, उभारणं, नातं उभरणं, जगणं आणि जगू देणं, मरणं आणि मरु देणं या संज्ञांना पोकळ न समजता त्यांची चिकित्सा करु पहाते. सहजीवन, समानता, संभोग या सोयीस्कर शब्दात स्त्रीला समासाबाहेर ढकलण्याचं राजकारण समजल्यावर कवयित्री म्हणते.

" याहून निराळं का असत नाही असणं

याहून निराळं का असतं नाही नसणं"

(पृ.१०)

प्रज्ञा लोखंडे स्त्री मनाची घुसमट नेमकेपणानं स्पष्ट करतात. जातीय, लैंगिक, एकूणच तिच्या अस्तित्वाचा प्रश्न, तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्व आकाराला येतानां व्यवस्थापनेतून

संघर्ष उभा केला जातो. ते त्या प्रखरपणे मांडतात. सर्वच पातळयांवरचे स्त्रीचे अस्वास्थ्य पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे निर्माण झाले आहे. असे कवयित्रीचे म्हणणे आहे. कवयित्री म्हणते की आत्मसंभोगापलीकडे काहीच पाहू न शकणाऱ्या भाष्यकारांना मी खिजगणतीत धरुच कशाला?

"भूक जन्म घेते

तरी संपत नाही

अद्भूत शोध"

(पृ.१७)

आणि माझे अस्तित्व, भान, स्वत्वाची जाणीव हे सारं मी मागेच देऊन बसले आहे. नव्याने नांगरायला माझ्याकडे काहीच नाही. तरी माझा रोजच संघर्षाचा दिवस असतो. नव्या अंतर्ज्ञानाला बाईपणाच्या निखळ निरभ्र उगमामध्ये कोणत्याही अंतिम सत्याचा दाव न करणारा असे कवयित्री म्हणते.

स्त्रीमुक्ती प्रतिनिधीत्व करणारं एक संयत व्यक्तिमत्व म्हणजे सावित्रीबाई फुले होय. हे व्यक्तिमत्व सांतत्रयोत्तर काळात स्त्री जाणिवेच्या केद्रंस्थानी राहिलं आहे. प्रज्ञा लोखंडे म्हणतात-म.फुलेंच्या स्त्री शिक्षणाच्या कार्यात बरोबरीने सहभाग घेतलेली सावित्रीबाई बाईच्या थडथडत्या काळजातही विद्रोहाची पहिली ठिणगी आहे. जी पुराणातल्या सावित्रीचं बुरसटलेलं मिथक तोडून नवऱ्याच्या अंतयात्रेत टिटवं हातात धरुन शिरोभागी चालली. कवयित्री म्हणते-

" भाकरी थापता थापता

तुला ऐकू आलं अराजक

भाकरी थापता थापता"

तुला आला अक्षरांचा वास

(पृ.१७)

बिघडून गेलेल्या उत्पत्ती स्थितीला सावित्रीबाईंनी ओळखलं होतं. स्त्रीमुक्तीच्या संदर्भात त्यांनी उचललेलं पाऊल कितीतरी क्रांतीकारी होतं. सावित्रीबाई फुले यांच्यासाठी कवयित्री कृतज्ञ भावनेतून म्हणते की,

" सावित्रीमाय,
तू फोडून टाकलास एकदाचा
तो सनातन मायावी आरसा
किंचाळत बाहेर आल्या
पटापटा कितीतरी बाया
शोधू लागल्या पाळामुळांना...
रचत राहिल्या स्वतःला
तुकडया तुकडयातून
अखंडित माझ्यासकट!"

(पृ.१७)

सवित्रीबाईप्रमाणेच कवयित्री प्रज्ञा लोखंडे रमाबाई आंबेडकरांविषयी लिहितात. कर्तेपणाच्या इतिहासात रमाबाईचा संदर्भही येत नाही. आणि लिहायची वेळ आली तर रमाबाईंना सोशिक, कनवाळू, ममतेची पुतळी, असीम त्यागी, आदर्श स्त्रीत्वाच्या साच्यात नेऊन बसवले. केंद्र आणि परिघाचे अपरिवर्तनीय गृहीतक युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पार बदलऊन क्रांती घडऊन आणली. कवयित्री म्हणते रमाई या सगळयात तू कुठे आहेस?

" मला तू कधीच वाटली नाहीस
युग पुरुषाची फक्त 'सावली' तू
स्वतंत्रपणे उभारलास तुझा मूक विद्रोह
परंपरिकतेतली अऱ्पारंपारिकता जाणून! (पृ.७२)

म्हणूनच कवियत्री म्हणते की भ्रमानं लिहिल्या गेलेल्या इतिहासात पुरुषार्थाच्या संकल्पनेत बाईचं असतेपण पार अदृश्य करुन जातं. म्हणूनच कवयित्री म्हणते की-रमाबाई मला लिहायचीय तुझी वेदना, तुझ्या खस्ता न् श्रम, तुझ्या नसण्याचा काळोख आणि देव नसलेल्या क्रांतिकारी पंढरपूर उभारताना तू चिरा झालीस तो इतिहास मला लिहायचाय असे कवयित्री म्हणते.

कवयित्री प्रज्ञा लोखंडे म्हणतात की, सिध्दार्थाने अनित्य वादाचा आणि करुणेने ओतप्रोत असलेल्या प्रज्ञेचा स्वतः प्रत्यय घ्या. हे तत्वज्ञान सांगितले. जीवनातील दुःख समजाऊन घेऊन त्यापासून मुक्तता करण्याचा मार्ग बुध्दाला सापडला पण तरीही कवयित्री म्हणते की सिध्दार्थ बुध्द होण्याचा कवयित्रीला मोह होत नाही तर

' कवयित्रीला मोह होतो

यशोधरेचा,

सिध्दार्थाच्या रित्या कटोऱ्यातील अपरंपार क्षुधा

काठोकाठ शमवणाऱ्या

सिध्दार्थाला बुध्दत्व बहाल करणाऱ्या

यशोधरेच्या लसलसत्या विराट

तृष्णेचा

कवयित्रीला मोह होतो...'

(पृ.१२)

सिध्दार्थ बुध्द, महात्मा फुले आणि बाबासाहेब आंबेडकर या महामानवांसोबत त्यांच्या कार्यात समर्पित वृत्तीने सहभागी झालेल्या यशोधरा, सावित्रीबाई आणि रमाबाई यांच्या संचिताला, केलेल्या त्यागाला इतिहास शब्दबध्द करु शकला नाही. ही खंत प्रज्ञा लोखंडे नी व्यक्त केली आहे. आणि दुर्लक्षित झालेली गोष्ट इतिहासात का लिहिली जात नाही? याचे उत्तरही प्रज्ञा लोखंडे यांना सापडते. ती म्हणजे इतिहासलेखना मागील पुरुष सत्ताक व्यवस्थेचा हस्तक्षेप होय. कवयित्री म्हणते

" किती भ्रमाने लिहिला जातो इतिहास
पुरुषार्थाच्या संकल्पनेचा
जित्याजागत्या हाडामांसांच्या बाईचं
असतेपण पार अदृश्य करुन"

(पृ ५२)

सत्तरीच्या दशकात सुरु झालेल्या स्त्रीवादी चळवळीच्या निमित्ताने अनेक कवयित्रींनी स्त्रीवादी दृष्टिकोनातून वेगवेगळया व्यवस्थांचे व अनुभवांचे रुप कवितेतून व्यक्त केले. अश्विनी धोंगडे म्हणतात," स्त्रीवादी साहित्य हा मराठी साहित्यामध्ये एक पूर्णपणे नवी जाणीव घेऊन अवतरणारा प्रवाह आहे. " [२] परंतु संस्कृतीच्या आणि इतिहासाच्या प्रदीर्घ परिप्रेक्ष्यात विविध व्यवस्थात्मकतेचे असे अनुभव कवयित्री स्वतःच्या विशिष्ट शब्दकळेद्वारे प्रकट होण्याची प्रक्रिया प्रज्ञा लोखंडे यांच्या काव्यलेखनातून प्रथमच घडली. कवयित्रीने साऱ्या शोषणप्रक्रियेकडे स्त्रीवादाच्या प्रखर जाणिवेतून पाहिले आहे. पुरुषसत्ताक अधिसत्ता स्त्रीच्या बाबतीत नेहमी जेत्याचा स्वरुपात वावरत आली आहे. पुरुषपरत्वे, व्यक्तिपरत्वे आणि वयोपरत्वेदेखील शोषणाच्या तऱ्हा वेगवेगळयाच राहिल्या आहेत.

" कुणी म्हणालं
तू हिरवीगार काकडी कोवळी तुला कच्चीच चावावी.
कुणी म्हणालं
तू भाकर गरम किंवा शिळी भूक लागली की तुला पोटभर खावी.
कुणी म्हणालं
तू मलई बर्फी अल्लाद ओठात विरघळणारी.
कुणी म्हणाल हाय ये शबाब कंबख्त नशा उतरताही नही
काल परवाचा मिसुरंड फुटलेला कुजबुजला कानात

तू च्युईंगम तुला सतत चघळावी "

(पृ.४७)

ही व्यवस्था, हा पुरुष बेरकी आहे. तो स्त्रीदेहाचा भोगासाठीच विचार करतो. पातिव्रत्य, योनीशुचिता यांच्या नावाखाली सीता, सावित्री, उर्मिला कंवा हिडिंबा, त्राटिका, पुतना अशा अधिसत्तेन लादलेल्या मिथकांचा कंटेनर वाहून नेणाऱ्या सावल्या निर्माण केल्या. संस्कृतमधल्या अष्टनायिका, अभिसारिका पासून अलीकडच्या साहित्यातही भोगवादी स्त्रीप्रतिमाच निर्माण केली जाते.

कवयित्री म्हणते

" खरंच, कुणीच कसं मला म्हणत नाहीये

अजून?

तुझ्या मांडयामधल्या वीतभर जागेपलीकडे

आहे एक जागा

तळपती!"

(पृ. ४७)

ती जागा सापडत नाही. म्हणून पुरुष दुःखी आहे. संकेत बध्दतेतून पुरुष बाहेर येत नाही तोवर स्त्रीवेदना, दुःख संपणार नाही याची जाणीव कवयित्रीला आहे. त्याबरोबरच या संकेतबध्दतेतून स्त्रीही बाहेर पडत नाही याचे कवयित्रीस तिव्रतर दुःख आहे.

कवयित्री स्त्रीशोषणाला लावलेली जुनी मिथकं नाकारते. त्याचप्रमाणे पुराणातल्या मिथकांकडे नव्या दृष्टिकोनातून पहाते. इतिहासाचा नवा अर्थ लावू पहाते. 'बघता बघता कब्जाच घेतला रावणाने' यात रावण स्ट्रॅटेजी म्हणून सीतेला पळवल्याचे सांगतो

"चामडीच्या खेळासाठीच पळविली मी तिला

हा मेसेज आख्खा उपखंडात व्यवस्थित मॅनेज केला त्यांनी..."

(पृ. ३९)

पुढे तो म्हणतो

"मुळातूनच चुकलंय त्यांच्या ग्रॅण्ड नॅरेशनचं

गृहितकं!

आणि , शूर्पणखा?

इतक्या सहजासहजी निकाला काढताय तिला?

अमानुष छाटलेली..."

(पृ.३९)

कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी पुरुषसत्ताक व्यवस्थेची आक्रमक अमानुष बाजू मांडली आहे. महाभारत रामायणातील संदर्भाचे पोष्टमार्टेम करुन कवयित्री नव्याने स्त्रीवरील अन्याय–अत्याचार अमानुष तेचा आपल्या कवितेतून मांडताना दिसते. कवयित्रि म्हणते

" खरचं मला कधीच लिहायची नव्हती कविता

ना समंका लीन

ना सार्वकालीन "

(पृ.४३)

सर्वच पातळयांवर संपुष्टात येत चाललेला विवेक कवयित्रीला स्वस्थ बसू देत नाही. आत्मभान डिवचणारा हा भोवताल तिला सतत नजरेसमोर येतो. तसेच कितीही प्रयत्न केले तरी त्याला यश न आल्याने स्त्रीमुक्तीची लढाई चालूच आहे आणि मग कविता ही लिहिणे ही प्रज्ञा लोखंडे यांची गरजच होऊन बसते.

" मी लिहीन म्हणते

बाईच्या एकांताचा इतिहास

निबिड, नवाकोरा"

(पृ.४२)

कवयित्री म्हणते सत्तेने न पाहिलेली आग आणि नित्य अनित्य यांच्या बदलण्याच्या तयारीत असतो सत्तेचा प्रमाथी घोडा अनेक बलात्कार अनेक बलात्कारानंतर सहज घडत जातात. इसवीसनपूर्व ते पोस्टमॉडर्न म्हणूनच कवयित्री म्हणते

" मला लिहावीच लागते कविता
यापुढे कधीच लिहावी लागू नये म्हणून
दगड होण्याची जोखीम पत्करुन
समकालीन आणि सार्वकालीन!"

(पृ.४३)

'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' या काव्यसंग्रहातून कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी स्त्रीमुक्तीचं प्रतिनिधित्व करणारी कविता लिहिली आहे. स्त्री दुःखाला, तिच्या करुणेच्या परिभाषेला ओळखू शकणारी अशी ही कविता आहे.

कवयित्री आपल्या लिहिण्यामागील प्रेरणा ही खरी स्त्रीमधील माण

## निष्कर्षः

१. पुराण काळापासून ते पोस्ट मॉडर्नच्या समाजव्यवस्थेतील स्त्रीप्रश्नांना मांडण्याचा प्रयत्न या काव्यसंग्रहातून केलेला आहे.

२. धर्म, राष्ट, इतिहास आणि संस्कृती यांनी लादलेले नुकसान दुय्यमत्व नाकारुन स्वमुक्तीसाठी, स्वशोधनासाठी निघालेली स्त्री या कवितांमधून दिसते.

३. सिध्दार्थ बुध्द, महात्मा फुले आणि बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या कार्यात त्यांच्यासोबत समर्पित वृत्तीने, त्यागाने सहभागी झालेल्या यशोधरा, सावित्रीबाई आणि रमाबाई यांच्या संचिताला, केलेल्या त्यागाला इतिहास शब्दरुप देऊ शकला नाही. अशी खंत या कवितांमधून व्यक्त होते.

४. महाभारत-रामायणातील संदर्भाचे पोस्टमार्टेम करुन कवयित्री नव्याने स्त्रीवरील अन्याय-अत्याचार-अमानुषता आपल्या कवितेमधून मांडताना दिसतात.

## क) स्त्री–पुरुष संबंधातलं वास्तव

प्रज्ञा लोखंडे यांनी स्त्री मनाची घुसमट नेमक्या कोणकोणत्या घटकांमुळे होते हे आपल्या कवितेतून स्पष्ट केले आहे. तिच्या अस्तित्वाचा प्रश्न, तिचे स्वतंत्र व्यक्तीमत्व साकार होताना धर्म, जात, भाषा, सामाजिक, सांस्कृतिक संकेत यांबरोबर उभारलेल्या संघर्षाचे कवयित्री चित्रण करतात. स्त्री–पुरुष संगंधातलं कुरुप वास्तव आपल्यासमोर या कवितेच्या माध्यमातून समोर येते. कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी पारंपारिक स्त्री-पुरुष प्रतिमा या 'नवे स्त्री–पुरुष संवेदन' च्या अस्तित्वात येण्याच्या मार्गातील अडथळा मानले आहे. म्हणून पारंपारिक स्त्री प्रतिमा जशी कवयित्री नाकारते तशी पारंपारिक पुरुषप्रतिमाही कवयित्री नाकारते.

"नेणिवेतले संपूर्ण रोकडे शब्द
नेणितेतला भाषेचा लोळ
नेणिवेतला नवाकोरा पुरुष
कधीच उमटला नाही
तिच्या प्रगल्भ कॅनव्हासवर"

(पृ. ३)

कारण पुराणकाळापासून ते आधुनिकतेपर्यंतचा एकूण पुरुष स्त्रीची लोभस सुसंगत प्रतिमा शोधत रहातो. त्या पुराणपुरुषाने स्त्रीची अशी प्रतिमा अनेक शतकांपासून जपलेली आहे. स्त्री सुध्दा प्रत्येक क्षणाला घडणारी अशीच होती अगदी पोस्ट मॉडर्न पर्यंत पण आता मात्र हे होत नाही.

"माझी सुसंगत प्रतिमा लोभस
त्याच्या पंटयातून कधीच निसटलेली!"

(पृ.१६)

असे कवयित्रीला वाटते. कारण स्त्रीने परंपरागत चालत आलेल्या जन्मजात उतरंडीची मिरासदारी नाकारुन आपले 'माणूसपण' अधोरेखित केले आहे. अशा स्त्रीला इतिहासाचं किंवा वर्तमानाचं कुठलंच पान प्रेमाच्या तंद्दन लाल गुलाबीने रंगवायचं नाहिये. प्रेमाचा

विराट गुंता संपवण्याचं क्रौर्य कवयित्री नाकारते. भ्रमात जगणारे विधिरचिताचे तोकडे अभिनिवेश कवयित्री नाकारते. कारण आता मातीसारखं थेट असण्याला, हवेसारखं मिसळून जाण्याला, आणि भूक लागल्यावर भाकरी खाण्याला अशाच पारदर्शी जगण्याला कवयित्री प्राधान्य देते. आणि भाकरीच्याही वर उठण्याला कवयित्री प्राधान्य देते. 'माणूस भाकरीवर जगत नाही' हे बाबासाहेबांचे मत तिला पटले आहे.

पारंपरिक संकल्पना अशी मांडली जाते की, स्त्रीक्षेत्र जमीन आहे. पुरुष क्षेत्रज्ञ तो क्षेत्राचे जमिन रक्षण करतो, मशागत करतो आणि त्यात बीज रुजवतो. जमिनीची जितकी अधिक मशागत केली जाते तितकी ती लागवडी योग्य ऱ्रुजून येण्याइतकी होते. पुरुषाने ही स्त्रीला त्या रीतीने वागवावे.

कवयित्रीला खोटया प्रेमशब्दातील फोल नात्यातील शोषण समजलं आहे. म्हणूनच तिने बाईपणाचा तिच्या निबीड एकांताचा नवा कोरा इतिहास लिहिला आहे. इहिसाला पर्यायी इतिहासच मांडणारी उर्मी बाळगणारी स्त्रीला तद्दन जुन्या पुरुषाला पर्याय सापडला नाही. उलट अतिशय सालस, सुसंस्कृत, पुरुषाची स्वप्रतिमा तिने निर्माण केली. त्यामुळे परंपरागत चालत आलेले पौरुषत्व सिध्द करण्यासाठी स्त्रीची नग्न धिंड काढणे, चाबकाने फोडणे, उकळत्या तेलात हात घालायला लावणे. अशी त्याच्या मनामध्ये दडलेली हिंसा कवयित्रीला दिसते.

"पुरुष असल्याची
त्याला मोजावी लागतेय जबर किंमत
माणसासारखा माणूस असूनही."

(पृ.३४)

कवयित्री म्हणते मी अजून भोगतेय बाईच्या 'संज्ञेचं उत्तरदायित्व जेव्हा तू उभा राहतोस देहाचा खरेपणा घेऊन तेव्हाची तुझी लखलखीत नग्न नजर मला सहन होत नाही. आणि माझ्या संज्ञेला प्राशून घेण्याची प्रचंड तहान तुला लागलीये. तू आत्यंतिक नवा आणि समग्र आहेस या क्षणां अशी कवयित्रीला तुझी प्रतिमा दिसते. इतिहास बदलत रहातो तसा त्याचा चेहराच फक्त बदललाय. कवयित्रीला वाटलं की सवयीनं येणाऱ्या आदिम खेळाला मी प्रेम नाव दयावं यासाठी तू पुरुषी कांगावा करशील. पण तसं न करता माझ्यातल्या स्त्रीत्वाला संपवणारं रसायनच तू गिळून टाकलंस आणि

"केलंस मला
रुजून येणाऱ्या मातीइतकं सहज" (पृ.२०)

असं कवयित्री म्हणते. हवा, पाणी, कला, साहित्य, देश, राजकारण धर्म यांमध्ये आख्खाच्या आख्खा पुरुष, आणि संपूर्ण स्त्री यांना कसंही करुन फाटयावर मारता येतं. पण तरीही तद्दन जुना पुरुष षड्विकारांच्या लिडबिडाटात सदासर्वदा अडकून पडलाय. कवयित्री म्हणते की माझी सावली मात्र त्याच्यामधून सरकू शकत नाहीये.

कवयित्री म्हणते आयुष्याचं दार मध्येच बंद होतं. काचे अलिकडंचं जगं, आणि कांचेपलीकडचं जग अशी विभागणी कवयित्रीला नको होती. जिथंवर एकमेकांचे आवाजही पोहचत नाहीत अशा सहज स्वाभाविक विभ्रमांकडे तू मला का आणतोस? आणि माझ्यातून नष्ट होत जाणारं नातं मौलिक असल्यासारखं तू का शोधत राहतोयस? असा प्रश्न कवयित्री विचारते. कवयित्री त्याची प्रतिमा शोधू पाहते आहे. कवयित्री म्हणते तू आहेस दगडा सारखा देखणा, पावसांसारखा साधा, उग्र रासवट फुलांसारखा आवेगी उच्छाद किंवा सावित्रीला भेटलेल्या फुल्यांसारखा

"जीव ओवाळून टाकावा
असा दखलपात्र पुरुष
अथपासून इतिपर्यंत
फक्त माणूस असलेला
माणूस"

अशी ही कवयित्रीची दृष्टी एकाच बाजूने विचार करणारी नाही. 'एकमय होतो आपण' यात स्त्री-पुरुषांचे जित-जेता संबंधाचे चित्र करताना कवयित्री स्त्री जीवनाचे सर्व कढ पुरुषांच्या नावावर डकऊन नामानिराळं व्हायचं नाही. आणि पुरुषाला शोषकाचा मुखवटा चढऊन कधीच न मांडलेला डावही जिंकायचा नाही. फक्त

"मला मोकळा करायचा होता जीव
सत्ता—नात्याच्या
जीवघेण्या जंजाळात घुसमटणारा"

(पृ.३२)

अशी स्पष्ट कबुली कवयित्री देते.

कवयित्री म्हणते जेव्हा एकमेकांपर्यत पोचेपर्यंत अस्तित्व आणि सर्वस्व बदलेलं असेल.

"तुझ्ऱ्याजवळ तुझं प्रेम येईल

तुला कळणारही नाही
माझ्याजवळ माझं प्रेम येईल
मला कळणारही नाही."

(पृ. १७)

एकदा संपत गेलेले नातेसंबंध पुन्हा किती म्हटले तरी जुळून येत नाहीत. असे या कवितेतून व्यक्त झालं आहे.

प्रज्ञा लोखंडे यांनी नातं संपुष्टात आल्यावर मनाच्या छिन्नभिन्न अवस्थेचं केलेलं चित्रण अतिशय मार्मिक झालं आहे. कवयित्री म्हणते की तुला एकाएकी प्रेमाचा भ्रम झाल्यावर मला शोधत रहतोस. पण नग्नतेच्या आत आणि बाहेर एक कोरी जागा आहे. फक्त जी तुला सापडत नाही. रोज सतत विस्कळीत होणारी संबंधाची सार्वभौम अदा मी पाहिल्यानं आता. तुझ्या खूप दुःखी असण्याचा माझ्यावर काहीच परिणाम होत नाही. असे कवयित्री म्हणते. कारण नेमकं काय हवं असतं प्रेमाला हेच त्याला अजूनही समजलेलं नाही.

कवयित्री म्हणते की एखादं अस्वल गुदगुल्या करुन मरणांतिक हसवतं आणि धडधकट जगण्याला बघता बघता संपऊन टाकतं कायमचं. तूही असचं केलं आहेसं.

"शेवटी तू देखील काढलीसच बाहेर
तुझी पुरुषी नखं आक्रमक"

(पृ. 34)

कवयित्री म्हणते पण त्यात मला आश्चर्य वाटत नाही. अस्वलासारखंच तू ही एक जीवन संपऊन टाकशील परंतु तुझी पध्दत थोडी वेगळी आहे. कारण तू एक परंपरागत पुरुष आहेस.

पुरुषी भोगवृत्तीला भले तो प्रेम म्हणत असला तरी कवयित्री येथे 'अस्वलाच्या गुदगुल्याची ' अत्यंत मार्मिक प्रतिमा (फीट) चपलखपणे बसवली आहे. अस्वलाच्या गुदगुल्या हया आनंद निर्मितीसाठी नसतात फार हिडीस भयावह-जीवघेणा क्रूर असा तो शोषकाचा खेळ असतो. स्त्रीविषयीची पुरुषी भोगवृत्ती कवयित्रीने नव्या प्रतिमेतून अत्यंत परिणामकारक मांडली आहे. परंपरागत चालत आलेल्या संस्कृतीनं जपलेले पुरुषसत्ताक पण पूर्ण नष्ट व्हावे असे नाही. पण स्त्रीत्वाचा अपमान न करता स्त्री-पुरुषानं सहजीवनाचा आनंद घ्यावा असं कवयित्रीला वाटतं.

याचं स्त्री–पुरुष समानतेच्या संदर्भात शारदा साठे म्हणतात, "स्त्री-पुरुष समानतेचा आविष्कार घडविण्यासाठी मार्गदर्शक करणारे किंबहुना मदतकारक ठरणारे एक विचारसूत्र म्हणजे स्त्रीवाद होय." [३]

तसं पाहिलं तर स्त्रीमुक्ती म्हणजे काय? अशी मुक्ती देणारा कोण आहे? पुरुष जर रुढी, परंपरा, संकेत बध्दतेत अडकलेला असेल तर तो तरी कसे स्वातंत्र्य देऊ शकेल? जो स्वतःच स्वतंत्र नाही तो दुसऱ्याला कसा मुक्त करु शकेल? स्त्रीवाद म्हणजे स्त्री-पुरुष दोघांच्याही मुक्तीचे, समानतावादाचे तत्वज्ञान आहे. तो दोघांच्या मुक्तीचा, स्वातंत्र्याचा प्रवास आहे. सत्ता आणि नात्यांच्या पारंपारिक व प्रस्थापित जंजाळातून दोघांनाही मुक्त होता येत नाही. स्त्रीवादाच्या तत्वप्रणालीतून स्त्री पुरुषांच्या जिवंत, अस्सल, उत्कट संबंधानुभवाच्या लाभासाठी पर्यावरण निर्माण करु शकेल. असे कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांना वाटते.

## निष्कर्ष:

१. स्त्री-पुरुष संबंधांतलं कुरुप वास्तव या कवितेच्या माध्यमातून समोर येते.

२. परंपरागत चालत आलेल्या जन्मजात उतरंडीची मिरासदारी नाकारत स्त्री स्वतःचे माणूसपण अधोखित करते. हे कवितेचे मुख्य तत्व आहे.

३. पुरुषी भोगवृत्ती कवयित्रीने नव्या प्रतिमांतून अत्यंत परिणमकारकपणे मांडली आहे.

## ड) दलित स्त्रीवादी संकल्पनेतून साकारणारी कविता

या काव्यसंग्रहातून कवयित्रीने स्वसमाजाच्या वाटयाला येणाऱ्या अपमानबोधाच्या अनुभवांना साक्षात केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून आलेली सम्यक परिवर्तनाची दिशा दाखवणारी ही कविता आहे. संपूर्ण स्त्रीत्वाच्या गृहीत प्रारुपाला छेद देऊन फुले–आंबेडकरी स्त्रीवादाच्या संदर्भांना प्रज्ञा लोखंडे यांची कविता नव रचित करते. परंपरेने चालत आलेले चाकोरीबध्द स्त्रीजीवन, धर्म–संस्कृतीने लिपीबध्द केलेली कथा–महाकाव्य आणि समकालीन स्त्रीजीवनाचे वास्तव यातील विविध संदर्भ घेऊन कवयित्री त्यांचे नव्याने विश्लेषण मांडते. तेव्हा एक स्त्रीच्या माणूसपणाचे नवेच सत्य हाती देते. आणि पुरुषाच्या न माणूसपणाला आरपार करते. प्रज्ञा लोखंडे यांची काव्यलेखनामागी भूमिका ही स्त्रीवादी आहेच. परंतु पूर्वपरंपरेने चालत आलेला दलित तत्वाचा वादही त्या नजरेआड करु शकत नाहीत त्या म्हणतात

"माणसासारखा माणूस असूनही
त्याला काढायी तिची नग्न धिंड
करायंय तिला विद्रूप"

(पृ. ३४)

यासारख्या कवितेतून दलित स्त्रीवादी जाणिवा अधिक स्पष्ट होत जातात. कधी विमुक्त नव्हतं स्त्रीचं आईपण. कवयित्री म्हणते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठा विदयापीठ नामांतर आंदोलनात स्त्रीचीच विटंबना केली गेली.

"नामांतर लढा तीव्र होताना
तिला केलं गेलं नागवं
भर रस्त्यात भरचौकात
दलितांना धडा शिकवण्यासाठी"

(पृ. ३)

एखादया स्त्रीवर ती स्त्री आहे म्हणून आणि ती दलित आहे म्हणून दुहेरी अत्याचार होती. तिची छळवणूक होते. आत्मभान जागं झाल्याबद्दल शिक्षा म्हणून तिच्यावर बलात्कार केला जातो. तसेच तिच्या जातीवाचक गर्भाशयातून तत्सम जातीचं अर्भक जन्मू नये म्हणून स्त्रीची जननेद्रियचं छाटून टाकण्यात आली. कवयित्री म्हणते

जातियतेच्या परंपरागत चालत आलेल्या संदर्भामध्ये पुन्हा स्त्रीलाच केंद्रस्थानी ठेऊन तिला विद्रुप केलं जातं. कवयित्री म्हणते

"मला नव्हता फाडायचा
साळसूद मुखवटा आदर्शाचा
सोय करायची होती संस्कृतीची
बेमालूम चालत आलेली"

(पृ.२५)

कवयित्री पुढे म्हणते की जगण्यातच लागण होती किरकोळ बाई बनून जगण्याची. आग आणि फुफाटा हे फक्त दोनच पर्याय उरतात बाईच्या पुरुषरचित संज्ञेला. कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांना अधिसत्तेनं जातीयतेच्या खाईत लोटलेल्या स्त्रीची वेदना मांडली आहे. कवयित्री म्हणते

"नेमक्या कुठल्या शांततेची कविता
लिहू पाहतेय मी?"

(पृ. ४४)

पीस ॲन्ड हार्मनी अत्यंत हिंसक शब्द आहेत असं कवयित्रीला वाटते. भारतीय धर्म, वर्ण व जात व्यवस्थांनी भारतीय स्त्रीवर्ग निर्माण होऊ दिला नाही. मराठवाडा, रमाबाईनगर, खैरलांजी पर्यंतची दलित स्त्री अत्याचारी प्रकरणं असोत की गोध्रा, राजस्थान मधील स्त्री अत्याचारी कहाणी असो कवयित्री म्हणते

"मी कुठल्या जातीची आहे अन् धर्माची
काळी की गोरी,
कॉस्मो की –अ–महानगरी"

(पृ.46)

यावरुन मोजमाप केलं जातं. एका समाजाला त्यांचा जमातवाद जागा झाल्याबद्दलची शिक्षा म्हणून स्त्रीलाच अत्याचारित केलं जातं. अपमानिंत केलं जातं.

"त्यांनी ॲसिड फेकलं,
स्तनं छाटली,
लिलाव केला. माझा जाहिर,
धिंड काढली नागव्यानं"

(पृ. ४६)

अशा अत्याचारामध्ये स्त्रीच्या मानसिकतेचा अर्थ कसा लावायचा? असा प्रश्न कवयित्रीला पडतो आहे. कारण जगण्याच्या तमाम प्रहरातली. हिंसा लिहिता येत नाही. प्रत्येक वेळी असे कवयित्रीला वाटते. अशा नितांत कोऱ्या होत जाणाऱ्या शून्यापर्यंत मला पोहचायं नव्हतं कवयित्री म्हणते-

"वाटला नव्हता
इतका विक्राळ होईल
व्यक्ती –समष्टी –सृष्टीचा गुंता
आता दगडात शिरु
की दगड होऊ?"

(पृ.७१)

असा प्रश्न कवयित्रीला पडला आहे. कवयित्रीची संवेदनशीलता अशी आत्यंतिक अलवार–हळुवार होताना जाणवते. कवयित्री प्रज्ञा लोखंडे म्हणतात की स्त्रीला अत्याचारीत केल्यावर अपमानीत केल्यावर तिच्या अस्तित्वाला होणारी जखम भरली जात नाही. आज भरेल उदया भरेल म्हणताना काळही अशा जखमेवर खपली धरु शकत नाही. असं कवयित्री म्हणते.

परंपरागत संस्कृतीने जपलेल्या वर्णव्यवस्थेच्या खुणा पुसल्या जात नाहीत किती केलं तरी. कवयित्री म्हणते कविता लिहिणाऱ्या बाईत आणि वेश्येत काय फरक असतो?

"नेमकी कुठे वेगळी असते
विस्थापितांसाठी लढणारी कार्यकर्ती
नि बेस्ट बेकरी हत्याकांडांतली जहिरा एखादी?
जमातवादी पंज्यात
उर्वरित जगणारी!"

कवयित्री म्हणते एक–संपूर्ण –समग्र –स्वाभाविक असणारी लवथवती बाई मी कधी कुठे पाहिली होती आता आठवतही नाही इतका जातीयतेचा काच गळयाभोवती आवळला गेला आहे.

कवयित्री म्हणते की बाबासाहेबांनी पुढे पुढे जाण्याचं मानवीपण दिलं आहे. या समाजाला. वेदनेचं कातडं ताणून बसवलेली ही जनित्रं कुणाची आहेत हे कवयित्री विसरते. कारण प्रश्न फक्त भुकेचा नव्हता. जाणीव होती अपमान बोधाची. ठिणगी होती विद्रोहाची फक्त. आणि खुळखुळयाच्या काठीला शाश्वत भाकरीच्या

असण्याची जाणीव होती. कवयित्री म्हणते डॉ. बाबासाहेबांनी निष्कलंक केलं या परंपरागत अपमानित भुकेला. बावीस प्रतिज्ञा, पंचशील आणि त्रिशरणातून नखशिखान्त संनातन अंधाराचा पडदा फाडून टाकला. कवयित्री म्हणते की मी ही माझ्या शाळेच्या पाठयपुस्तकातून अद्‌भूत, अमूर्त आणि आदर्श असा भारत नावाचा देश पाहिला होता. परंतु एकदा शाळेतून घरी आल्यावर पाहिलं तर चाळीतल्या बायका आईवर तुटून पडल्या होत्या. नदीच्या वरच्या अंगाला उच्च वर्णियांनी पानी भरायंचं आणि खालच्या अंगाला अस्पृश्यांनी हा नियम परंपरागत चालत आला आहे. असा शतकानुशतकांचा लिखित नियम आईनं मोडला होता. तिला मज्जाव असलेल्या सार्वजनिक नळाच्या उजव्या बाजूला धुणंभांडी धुण्याचं, पानी भरण्याचा गुन्हा तिनं केला होता.

"तिच्या स्पर्शानं विटाळलं पाणी
तिच्या सावलीनं
बाटली पवित्र जागा
फार माजलेत भडवे
सरकारी पाहुणे
धरा गं, तिला
तुडवा सालीला..."

(पृ.७६)

कवयित्रीनं पाहिलं आईचे लाथाबुक्यांनी काळनिळं झालेलं शरीर फाटलेल्या ओठातून वाहणारं रक्त आणि अस्ताव्यस्त कपडे. घशात अडकलेल्या भयग्रस्त किंकाळया. बाबासाहेबांनी एका समाजाचे पुनरुज्जीवन करु पाहिले. तरीही अशा समाजाला सरकारी कागदोपत्री मान्यता मिळाली. समाजात वावरण्यासाठी त्यांना विटाळाचाच कलंक माथी घेऊन फिरावे लागले.

प्रज्ञा लोखंडे यांनी शोषित, वंचित समाजाचे दुःखं विशेषतः स्त्रियांचे दुःख आपल्या काव्यातून मांडले आहे. सत्तरीच्या दशकात दलित चळवळ अधिक टोकदार झाली. साहित्य आणि चळवळ या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या. त्या काळात अनेक लेखकांनी उद्रेक व्यक्त केला. विद्रोही लिखाण केले. त्या काळाशी ते सुसंगत होते. प्रज्ञा लोखंडे स्वतःच्या कवितेबद्दल म्हणतात, "माझी कविता एकसुरी नाही. दलित कवितेच्या प्रवाहात जे माझे पूर्वसुरी आहेत त्यांनी गावकुसाबाहेरचं जगणं थेट अनुभवलं होतं. स्वाभाविकच त्यांच्या कवितेत जातीय विषमतेचा आशय अधिक होता. जात वास्ताचे चटके मी अनुभवले नाहीत असं नाही. उलट , महानगरातल्या

तथाकथित उच्चभ्रू वस्तीतही 'जात' कशी दबा धरुन बसलेली असते. हे मला अजूनही ठायी ठायी जाणवते. परंतु जातीय शोषणाबरोबर माणसाच्या जगण्याला नियंत्रित करणारे अनेक संदर्भ, मग ते पुरुषप्रधान व्यवस्थेचे असोत, महानगरी ताठयाबाण्याचे असोत, भांडवली व्यवस्थेचे असोत वा जागतिकी करणाच्या वरवंटयानं निर्माण झालेल्या भयावह परिस्थितीचे असोत. माझ्या कवितेतून आपसूकपणे उमटतात." [४]

साहित्य आणि समाज एकमेकांशी अभिन्नपणे जोडले जातात. सध्याच्या काळातील चळवळी अगदी दलित चळवळ सुध्दा संपत जाण्याच्या मार्गावर आहे. त्या आता फक्त राजकीय अस्तित्वापुरत्याच दिसत आहेत. अशा वेळी साहित्यातून क्रांतीकारी भाषा येणं, विद्रोही स्वरुपाचं लेखन होणं शक्यच नाही. असे प्रज्ञा लोखंडे यांचे प्रामाणिक मत आहे. म्हणजे पुन्हा पुन्हा या मानवी जगात बलवत्तर आणि बळीचा शोषणाचा खेळ चालूच राहतो. माणूसपणाची चळवळ सत्तास्पर्धेच्या झमेल्यात टिकू शकत नाही. साहित्यनिर्मिती विशेषतः विद्रोही साहित्यनिर्मितीची तिव्रता तिक्ष्णता सत्तास्पर्धेच्या राजकारणात नाहीशी होते अशी कवयित्रीची प्रतिक्रिया म्हणजे समकाळावरील जळजळीत भाष्य आहे.

## निष्कर्ष:

१. प्रज्ञा लोखंडे यांची भूमिका स्त्रीवादाची असली तरी त्यांच्या काव्यातून दलित जाणिवांचा प्रवास सुरु होतो.

२. दलित जाणीव ही एकेरी न मांडता आपल्या काव्यातून प्रज्ञा लोखंडे यांनी दलित स्त्रीवाद ही संकल्पना नव्याने रुजविल्याचे दिसते.

३. संपूर्ण स्त्रीत्वाच्या गृहित प्रारुपाला छेद देऊन फुले–आंबेडकरी स्त्रीवादाच्या संदर्भांना प्रज्ञा लोखंडे यांची कविता नवरचित करते.

४. राजकीय सत्तास्पर्धा दलित जाणिवा आणि दलित विद्रोही साहित्य निर्मितीला बोथट करते.

## इ) सम्यक परिवर्तनाची दिशा ओळखून वैश्विक समग्रतेशी एकरुप होणारी कविता

कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी 'मी भिडवू पाहतेय समग्रतेशी डोळा' या काव्यसंग्रहातील कवितांमधून स्वसमाजाच्या वाटयाला आलेले दुःख आणि अपमान बोधाच्या अनुभवांना साक्षात केले आहे. परंतु त्यापेक्षाही इथली मूळ संस्कृती, संहितेमधील स्त्री–प्रतिमा, स्वसमाज संबध्द प्रज्ञावंत आणि करुणमयी स्त्री-प्रतिमा, प्रतीके यांच्याशी स्वतःला आणि त्यायोगेच स्वतःच्या स्त्री म्हणून असलेल्या अनुभवांना जोडून घेतले आहे. एक प्रकारे स्वतःचा आणि स्त्री च्या मुळांचाच शोध घेण्याचे आशयसुत्र प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या कवितांमधून मांडले आहे. या कवितांमधून बुध्द दर्शनाचे प्रभावी पाठबळ मिळते. बुध्दांच्या सम्यक तत्वज्ञानाचा कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांच्यावरील प्रभाव या कवितांमधून प्रत्यक्ष साकार झाला आहे. या बुध्द दर्शनाच्या प्रकाशात कवयित्री पुरुषसत्ताक व्यवस्थेतील स्वतःचे अस्तित्व काव्यात्म स्वरुपात समजाऊन घेते. स्त्रीचे सर्वांगीण शोषण करणाऱ्या परंपरागत पुरुषप्रधान अधिसत्तेचे स्वरुप स्पष्ट करण्याचे, स्त्री–पुरुष नातेसंबंध, व्यक्ती आणि समष्टी यांच्यातील संबध, त्यामधील विसंगती, या संबंधांचे एक प्रकारचे द्वंद्वात्मक स्वरुप व्यक्त करण्याचे, तसचे एक प्रकारचे ज्ञानात्मक म्हणावे असे कार्य कवयित्री या काव्यसंग्रहातील कवितांमधून करते. कवयित्री म्हणते

"मलाही व्हायं आहे
प्रकृती
मलाही व्हायचं आहे
सुजाता, पटाचारा, उत्पलवर्णा, संघमित्रा
मलाही लिहायची आहे
थेरी गाथाः
इसवी सन दोन हजार सहा..."

(पृ.१)

एक प्रकारचे ज्ञानात्मक कार्य करण्यासाठी कवयित्री स्वतः बौध्द संघातील या प्रज्ञावंत आणि ज्ञानी स्त्री प्रतिमा होण्याची उत्कट इच्छा कविता रुपातून व्यक्त करते. सिध्दार्थ गौतम बुध्दांना उद्देशून कवयित्री म्हणते की जे कुणाला दिसलं नाही ते तू पाहिलंस आणि त्यातून व्युत्पत्तीच्या दुःखाची गहनगूढ अद्भूत लिपी निर्माण झाली. कवयित्री

म्हणते बुध्दांनी कार्यकारणाच्या संज्ञेत ज्ञानाचा विराट अवकाश इतिहासजन्य केल्याने व्यक्ती समष्टी सृष्टितली पोकळी गच्च भरुन गेली. एक महान तत्वज्ञान 'अत्त दीप भव' तू स्वतःच स्वतःचा दिवा हो जगाला दिले. त्यातूनच स्फूर्ती घेऊन कवयित्री म्हणते-

"दिसावं पाण्याखालचं पाणी
न् चमकून जावा मधूनच
परावर्तित प्रकाश चकाकता
मी भिडऊ पाहतेय
समग्राशी डोळा"

( पृ. १)

यातून कवयित्रीला आयुष्याचं, भौतिकचं, अ–भौतिकाचं अंतःसूत्र पहायचं आहे. वस्तू आणि अ–वस्तूंना प्रत्यक्ष त्याच रुपात पहायचं आहे. अस्तित्वाशी हातमिळवणी करताना स्वतःलाच जोखून कवयित्री सम्यक म्हणजे काय? या प्रश्नाचा वेध घेऊ पाहते. सम्यक म्हणजे कोणतीही टोकाची भूमिका न घेता मध्यममार्ग स्वीकारणे होय. बुध्दांच्या या महान तत्वज्ञानातून समष्टीच्या परिवर्तनाची दिशा स्पष्ट होते असे कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांना वाटते. पारंपारिक विरक्तासारखा स्वतःचाच काळोख मोजणारे बुध्द कवयित्रीला कधी दिसलेच नाहीत. समकालीन–सार्वकालीन, सत्ता–अधिसत्ता, व्यक्ती–समष्टी, खाजगी आणि सार्वजनिक यांमध्ये असणारे यातनेचे, अस्तित्वाचे, अस्मितेचे तेच तेच प्रश्न बुध्दांना समजले होते. त्याला अनुसरुनच मानवी जीवन उजळवणाऱ्या प्रकाशाचे तत्वज्ञान बुध्दांनी निर्माण केले. कवयित्री म्हणते–

"सिध्दार्थाला साक्षात्कार होतो
'प्रतित्यसमुत्पाद'
सिध्दार्थाला साक्षात्कार होतो
'एहि–पस्सिको'
सिध्दार्थाला साक्षात्कार होतो
'अमला प्रज्ञा'
बोधिवृक्षाचं मिथक अस्सं झुलत राहतं
अनिवार
अनात्मवादाच्या ढळढळीत वास्तवात." (पृ. १२ )

म्हणजेच सिध्दार्थ बुध्दांना अनित्यवादाचा आणि करुणेने ओतप्रोत भरलेल्या प्रज्ञेचा साक्षात्कार झाला. त्यामुळेच या आणि स्वतः प्रत्यय घ्या असे आवाहन आपल्या धर्मतत्वज्ञानातून बुध्दांनी केले. याच तत्वज्ञानातून प्रेरणा घेऊन पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका महान कार्याची सुरवात केल. एका हीन दलित समाजाची क्रांती घडऊन आणली. असे कवयित्री म्हणते.

कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी असे म्हटले आहे की, भगवान बुध्दांची पत्नी, सावित्रीबाई फुले आणि रमाबाई आंबेडकर यांनीही आपल्या कार्यातून समाजामध्ये सम्यक परिवर्तनाची दिशाच स्पष्ट केली आहे. कवयित्री म्हणते.

तू
स्वतंत्रपणे उभारलास तुझा मूक विद्रोह
परंपरिकतेतली अऱ्पारंपारिकता जाणून!

(पृ ५२)

भगवान बुध्द, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या कार्यात सरळसोट एकाच रेषेत चालणाऱ्या रचिताला उलटंऱ्पालटं करुन परंपरागत संस्कृतीचा छेद करत एका नव्या समाजाच्या निर्मितासाठी या स्त्रिया अविरतपणे कष्ट करत राहिल्या. त्यांच्या कष्टांमुळे, केलेल्या अपूर्व त्यागामुळेच एक संपूर्ण समाज घडू शकला असे कवयित्री म्हणते. या स्त्रियांनी सनातन संस्कृतीचा मायावी आरसा फोडल्याने आजच्या स्त्रीला स्वतःच्या समग्र वैश्विकतेची जाणीव झाली असे कवयित्रीला वाटते.

भाषेपलीकडच्या मौनाशी एकरुप होताना कवयित्रीला हजारो उलथापालथींपूर्वीची मोहाची आणि तृष्णेची तत्वज्ञानाची गोष्ट आठवते. जी समजल्यामुळे बुध्दांनी समग्र मानवजातीचे कल्याण केले आहे.

कवयित्री म्हणते की बुध्द हे सूर्यप्रकाशा इतके थेट आहेत. गूढ, अनाकलनीय, दुर्बोध, रहस्यमय असे त्यांच्यात काहीही नाही. बुध्द म्हणजे पृथ्वीतलावरची पहिली सजीवता आहे.

"परंतु तरीही
निदान मी तरी तुला
बंद करणार नाही
महाकवी नावाया!
दखलपात्र मिथकात!"

(पृ. २२)

असे कवयित्री म्हणते.

समकालीन जीवन व्यवहारातून आलेली कवयित्रीची आत्मनिष्ठा समष्टीचा उद्‌गार होऊन साकारताना, समाजातल्या विकृत, अमानवीय वर्तमानाशी संयतपणे विद्रोह पुकारते. या विद्रोहाला बुध्दांच्या वैश्विक करुणेंचं अधिष्ठान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा तत्वनिष्ठ मूलगामी द्रष्टेपणा आहे. कवयित्री प्रज्ञा लोखंडे म्हणतात-

"मला हवाय
माझा समकालीन तोंडवळा
समष्टीच्या ग्लोबल कल्लोळात
अम्लान करुणेच्या
अनाहत आवाजांचा"

(पृ..४८)

समाजामध्ये सर्वच पातळयांवर संपत जाणारा मूल्यविवेक कवयित्रीला स्वस्थ बसू देत नाही. 'सम्यक म्हणजे काय?''कुठे सुरु होतो खासगीपणाचा आत्यंतिक तपशील?' 'नेमक्या कुठल्या शांततेची कविता लिहू पाहतेय मी?'... अशा प्रश्नांनी कवयित्रीच्या वाटयाला येणारी दमछाक तिला अगतिक करते. तेव्हा कवयित्री म्हणते–

"वाटला नव्हता
इतका विक्राळ होईल
व्यक्ती –समष्टी– सृष्टीचा गुंता
आता दगडात शिरु
की दगडच होऊ?"

(पृ.७१)

अशी आत्मभान कुरतडणारी जाणीव कवयित्रीला स्वस्थ बसू देत नाही. आणि मग परिवर्तन घडऊन आणणारी कविता लिहिणे ही कवयित्रीची गरजच होऊन बसते. कवयित्री म्हणत–मला कधीच लिहायची नव्हती कविता ना समकालीन ना सार्वकालीन. परंतु व्यक्ती–समष्टीचा विक्राळ गुंता प्रत्यक्षात समोर उभा राहिल्यावर कविता आपोआप फुटत राहते. कवयित्रीला व्याकूळ करत राहते. म्हणूनच कवयित्री म्हणते.

"मला लिहावीच लागते कविता
यापुढे कधीच लिहावी लागू नये म्हणून

"दगड होण्याची जोखीम पत्करुन
समकालीन आणि सार्वकालीन !"

(पृ. ४३)

समकालीन वास्तवाचे भान जपत असताना प्रज्ञा लोखंडे यांची कविता ही महानगरीय संस्कृतीची दु:खबधीर व माणुसकीशून्य वृत्ती अधिक स्पष्ट करणारी आहे. महानगरातल्या विराट कोलाहल सामाऊन घेणाऱ्या चेहऱ्यामागच्या ठणकणाऱ्या वेदनेला कवयित्रीने समर्पक काव्यात उतरवले आहे.

"गच्च ओसंडून वाहतो आहे
शॉपिंग मॉल
गच्च रिकामेच रिकामे आहेत
भुकेले हात"

(पृ. ७७)

स्वातंत्र्यानंतरही भूक मानवाच्या डोक्यावर थयथया नाचते. वाढते दारिद्रय, त्याने माणुसकी आटते आहे. महानगरातील असे बकाल जीवन प्रज्ञा लोखंडे यांच्या काव्यातून प्रतीत होते.

सम्यक परिवर्तनाची कविता लिहिताना कवयित्री आंबेडकरांना उद्देशून म्हणते की या सगळया समष्टीच्या पुढे पुढे जावे इतकं मानवीपण तू आम्हाला दिलंआहेस. जे कधीही छोटया स्वरुपात आकुंचन पावणार नाही अशा संहिता, सरनामा, घटना व्यवस्थांच्या संज्ञेचं अवकाश तूच दिलं आहेस. कवयित्री म्हणते "परंपरागत संस्कृतीमध्येही प्रश्न फक्त भुकेचा नव्हता. खुळखुळयाच्या काठीला गावकुसाबाहेरची असूनही शाश्वत भाकरीची जाणीव होती. कवयित्री म्हणते या अपमान बोधाच्या ठिणगीला कुणी विद्रोह म्हटलं, कुणी प्रवर्तन कुणी अम्लान करुण तर कुणी अमला प्रज्ञा म्हटलं. या सर्वापुढे जाण्यां बळ बाबासाहेबांमुळेच मिळालं असं कवयित्री म्हणते. कवयित्री पुढे म्हणते की माझ्या समाजाच्या उदयाच्या पिढीचा प्रतिनिधी असणाऱ्या माझ्या मुलावर मी कोणतेच परंपरागत संस्कृतीचे चालत आलेले संस्कार करत नाही. त्याच्या दंडात काळा गंडा दोरा बांधण्याचं कर्मकांड करत नाही. तो मुलगा आता वाढतोय नवायानात. ग्लोबलायझेशनच्या पसाऱ्यात जगतोय. मॅकडोनाल्ड, पिइझा–हट, सीसीडी मल्टिफलेक्स, आयपॉड सायबर कॅफेच्या जगजव्याळ जंजाळात तो जगतोय. तेव्हा कवयित्री म्हणते की माझ्या मुलाला मी .... असे न शिकवता ....

असे आपसुक शिकवत रहाते. आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपुढे नतमस्तक होत समष्टीच्या लाखो करोडो हातांनी अभिवादन करते असे कवयित्री म्हणते.

सम्यक परिवर्तनाची वाट चालत असताना, समग्र माणुसकीचे दर्शन घडवत असताना A फॉर आंबेडकर' असे मुळाक्षरांनांच नवे रुप देऊ पाहणारी प्रज्ञा लोखंडे यांची कविता अतिशय परिणामकारक ठरते.

## निष्कर्ष—

१. सिध्दार्थ बुध्दांच्या सम्यक तत्वज्ञानाचा प्रभाव या काव्यसंग्रहातील कवितांमधून दिसून येतो.

२. बुध्दांच्या महान तत्वज्ञानातून समष्टीचा परिवर्तनाची दिशा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखली. आणि हीन दलित समाजाला माणूस बनवून क्रांती घडऊन आणली.

३. सम्यक परिवर्तनाची दिशा ओळखून वैश्विक समग्रतेशी एकरुप होणारी प्रज्ञा लोखंडे यांची कविता आहे.

# ई) 'उत्कट जीवघेण्या धगीवर ' आणि 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा ' या काव्यसंग्रहांचे विशेष

आधुनिक मराठी कवयित्रींमध्ये विशेष स्थान असणाऱ्या प्रज्ञा लोखंडे या कवयित्री आहेत. त्यांची कविता मुळात स्त्री वेदनेशी निगडीत आहे. स्त्रीच्या वाटयाला येणारे पारंपारिक जग,दु:ख आणि नव्या जगण्याची आशा असणारी अशी त्यांची कविता आहे. प्रज्ञा लोखंउे यांनी मिथके, प्रतिमा, प्रतीके यांचा अनाठायी उपयोग आपल्या कवितेतून टाळला आहे. 'उत्कट जीवघेण्या धगीवर ' आणि 'मी भिडऊ पाहतेय समग्राशी डोळा' या काव्यसंग्रहांचे विशेष पाहताना स्त्री जीवनाच्या विविध टप्प्यांचा विचार करतानाच स्त्रीत्वाची संपूर्ण जाणीव, स्त्रीमुक्तीची कविता, स्त्री-पुरुष, स्त्री-पुरुष संबंधातील भयानक वास्तव, दलित स्त्रीवादी संकल्पनेची कविता, महानगराचे विदारक संवेदन आणि सम्यक परिवर्तन घडऊन समग्रतेशी एकरुप होणारी कविता या सर्व रचना विशेषांचा विचार करावा लागतो.

## दोन्ही काव्यसंग्रहातील स्त्री चित्रण

स्त्री जीवनातील अनेक वळणांचे चित्रण या काव्यसंग्रहांमधून आले आहे. कुठलीही स्त्री ही जन्मापासून स्त्री असत नाही. परंतु तिला नंतर जन्मभर हे बाईपणाचे ओझं वागवावं लागतं. शतकानुशतकं परंपरागत संसारचक्रात राबणारी बाई प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेचा मुख्य विषय आहे. अशा संसारचक्रात स्त्री स्वतःला हरऊन बसते.

"बाई शोधते तिचा हरवलेला नवरा
बाई शोधते तिचं हरवलेलं शरीर
बाई शोधते तिची फक्त तिची सावली
अंतर्बाहय रिकामी होत.
बाई शतकानुशतकं चौकोनी गुहेचं
माप ओलांडते."

(उत्कट जीवघेण्या धगीवर पृ. ७०)

स्वतःचं असं अवकाश-अस्तित्व बाई आता शोधते आहे. परंतु नर मादीच्या परंपरागत वेष्टनात ती अडकून पडते. म्हणूनच

"पुन्हा पुन्हा रुजवते ती मनस्वी यातंनांचा तुकडा
गते आदिम प्रसवाची अंगाई"

(उत्कट जीवघेण्या धगीवर पृ.७६)

असे कवयित्री म्हणते, प्रज्ञा लोखंउे यांची कविता स्त्रीमुक्तीं प्रतिनिधीत्व करणारी आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीवर प्रदीर्घ काळातीलही स्त्री शोषणाची जाणीव कवयित्री प्रखरपणे मांडते

"का आणला जातोय आड
अजूनही माझा स्त्री देहाकार?
योनीचं राजकारण करणाऱ्या
धर्मशास्त्रातल्या ध्वन्यर्थाचा?"

जगण्याच्या वेगवेगळया व्यवस्थांमध्ये स्त्रीच्या देहालाच प्राधान्य दिले जाते याचे कवयित्रीला वाईट वाटते. तसेच प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या काव्यसंग्रहांतून स्त्री सन्मानाचाही पुरस्कार केला आहे. त्या म्हणतात:-

"हे असं क्षणाची पत्नी
आणि अनंतकाळची माता वगैरे असण्यापेक्षा
स्त्रीनं अनंतकाळी माणूस असावं"

(मी भिडवू पाहतेय ... पृ.१०)

अशा माणूसपणाच्या हक्काची मागणी करताना प्रज्ञा लोखंडे यांची कविता दिसते. करुणेच्या सार्वत्रिक परिभाषेला ओळखू शकणारी बाई म्हणजेच आई ही प्रज्ञा लोखंडे यांची सन्मान प्रतिमा दिसते.

"प्रत्येक आई कोरत जाते
आपल्या त्वेचवर
आपल्या अवकाशावर
स्वतःचं लखलखीत अस्तित्व
बाईपासून आईपर्यंत
आईपासून माणूस असण्यापर्यंत"

(मी भिडवू पाहतेय... पृ. ३)

अशी अर्थघनता व सौंदर्यशीलता त्यांच्या काव्यात सहजतेने येते. याबरोबरच प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतून विधवा स्त्री, वेश्या, विमुक्त स्त्री अशी स्त्रीची अनेक रुपे प्रत्ययास येतात. संपूर्ण पुरुष जातीचं रहस्य समजलेली ती एकमेवच स्त्री असते असं कवयित्रीला वाटते.

"स्पर्शाच्या करोडो तऱ्हा
ज्ञात असलेली बाई
बाईच असत नाही
सदासर्वकाळ..."

(मी भिडवू पाहतेय .. पृ. ४)

असे वर्णन करताना भटक्या विमुक्त स्त्रीचे दु:ख कवयित्रीने मार्मिक पणे मांडले आहे. कवयित्री म्हणते

"चटक्यांचा वणव्याचा प्रदीर्घ इतिहास
पाठीवर घेऊन फिरणारी
स्त्री...
संस्कृतीच्या कुठल्याच पानावर
सपडत नाही मला माझा चेहरा"

(उत्कट जीवघेण्या....पृ. ४७)

अशा अगतिक स्त्रीचे चित्रण प्रज्ञा लोखंउे करतात. स्त्रीच्या प्रत्येक दु:खाची, वेदनेची सूक्ष्म वर्णने त्या आपल्या काव्यातून प्रतीत करतात. फक्त स्त्रीदु:खाचे चित्रण करणे हाच त्यांचा उद्‌देश नाही तर स्त्रीचा संपूर्ण उध्दार करण्याचा त्यांचा काव्यविचार आहे. या कवयित्रीच्या कवितेत रुपकात्मकता आधिक्याने येते. प्रतीके येतात. कवितेचे रुप सरळ, साधे, पारदर्शी नाही, त्यास अनेक पैलू आढळतात. त्यामुळे कविता आशयघन होऊन जाते.

## स्त्री-पुरुष संबंधांतील भयानक वास्तव

स्त्री-पुरुष संबंधांतलं कुरुप वास्तव या कवितांया माध्यमातून आपल्या समोर येते. पुरुषप्रधन पोलाछी चौकटीमध्ये जीवाच्या आकांताने फडफडणारी स्त्री. तिचे जीवन प्रज्ञा लोखंडे यांना अस्वस्थ करुने सोडते. गुलामीचा किंवा दु:खवेदनेचा 'अनंत'पणा कवयित्री ठामपणे नाकारते.

कवयित्री म्हणते-

"केंद्र आणि परीघाच्या
सुबक परंपरेत
अर्थहीन होत जातं
जिवापाड जपलेलं नातं
हळूहळू संपत जातं नात्यातलं चैतन्य
हळूहळू संपत जाते आतली धुगधुगी
उरतो फक्त सांगाडा
प्राणंसहित कातडीला वेढून असणारा"

(उत्कट जीवघेण्या पृ. ३४)

स्त्री-पुरुष नातेसंबंधांतील रितेपणा व फोलपणा सांगणारी अशी प्रज्ञा लोखंडे यांची कविता आहे. माणूसपणाच्या परिमाणाने जेव्हा स्त्री–पुरुष नाते तपासले जाते तेव्हा या कवयित्रीच्या हाती स्त्रीचे दास्य, दुय्यमत्व, अन्याय, वेदनाच अधिक येतात. या कवितेची ती प्रेरणा केद्रवर्ती होत. तसेच 'अस्वलांच्या गुदगुल्यां' च्या नव्या प्रतिमेतून पुरुषी भोगवृत्ती कवयित्रीने परिणामकारक पणे मांडली आहे.

## दलित स्त्रीवादी संकल्पनेची कविता

१९६० नंतरच्या कवितेमध्ये दलित कवितेचे योगदान महत्वपूर्ण आहे. स्व समाजाची कविता लिहूनही प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेवर फक्त दलित कविता अशी छाप पडत नाही. कवयित्रीने स्वसमाजाच्या वाटयाला येणाऱ्या अपमान बोधाच्या अनुभवांना साक्षत केले आहे. गावकुसाबाहेरचे दुर्लक्षित जग, शोषित, अभावग्रस्त समजाघटकांच्या भावानुभवांना प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या कवितेतून व्यक्त केले असले तरी त्यातूनही स्त्रीवादी भूमिकेचा प्रत्यय त्यांनी प्रकट केला आहे. प्रज्ञा लोखंडे यांची काव्यलेखनामागची भूमिका ही स्त्रीवादी आहेच. परंतु पूर्व परंपरेने चालत आलेला दलितत्वाचा वादही त्या नजरेआड करु शकत नाहीत.

"माणसासारखा माणूस असूनही
त्याला काढायचीय तिची नग्न धिंड
करायचंय तिला विद्रुप"

(मी भिडवू पाहतेय ..... पृ. ३४)

यासारख्या कवितेतून दलित स्त्रीवादी जाणीवा स्पष्ट होतात. कवयित्री
पूढे म्हणते

"नामांतर लढा तीव्र होताना
तिला केलं गेलं नागवं
भर रस्त्यात भर चौकात
दलितांना धडा शिकवण्यासाठी"

(मी भिडवू पाहतेय ..... पृ. ३)

एखादया स्त्रीवर ती स्त्री आहे म्हणून आणि ती दलित आहे म्हणून दुहेरी अत्याचार होतो. जातियतेच्या परंपरागत चालत आलेल्या संदर्भामध्ये पुन्हा स्त्रीलाच केंद्रस्थानी ठेऊन विद्रुप केले जाते. संपूर्ण स्त्रीत्वाच्या गृहीत प्रारुपाला छेद देऊन फुले-आंबेडकरी स्त्रीवादाच्या संदर्भांना प्रज्ञा लोखंडे यांची कविता नवरचित करते.

## महानगराचे विदारक संवेदन

महानगरीय संस्कृतीचे विदारक जीवन दर्शन घडवणारी अशी प्रज्ञा लोखंडे यांची कविता आहे. महानगरीय संस्कृतीचच्या दु:खदायक आणि माणूसकीशून्य वृत्तीला त्यांनी दाहक उपरोधाने आपल्या काव्यातून प्रकट केले आहे.

"भरगच्च रिक्त शांतता
पसरलीय मुलांच्या चेहऱ्यावर
डोळे सताडढ उघडे कोरे
कसल्याही प्रतिबिंबाशिवाय आणि
कसलाच भुकेकंगालपणा नसलेली भूक"

(उत्कट जीवघेण्या ..... पृ.२४)

महानगराच्या विराट कोलाहल सामाऊन घेणारी वेदनामयी कविता कवयित्री लिहिते.

"गच्च ओसंडून वाहतो आहे
शॉपिंग मॉल
गच्च रिकामेच रिकामे आहेत
भुकेले हात"

(मी भिडवू पाहतेय ...पृ.७७)

महानगरातील दारिद्रय, वाढती भूक आणि बकाल जीवन प्रज्ञा लोखंडे यांना अस्वस्थ करुन सोडते.

## सम्यक परिवर्तन घडऊन समग्रतेशी एकरुप होणारी कविता

महानगरीय संस्कृतीचे विदारक जीवनदर्शन घडवत असतानाच समग्र माणुसकीचा वेध घेणारी प्रज्ञा लोखंडे यांची कविता अधिक प्रभावी वाटते.

"मलाही व्हायचं आहे प्रकृती
मलाही लिहायची आहे थेरीगाथा"

(मी भिडवू पाहतेय ...पृ.१)

असे काव्य लिहणाऱ्या या कवयित्रीचे काव्यलेखन अतिशय सर्जनशील विचार प्रणालीचे आहे. स्वसमाजाच्या अपमान बोधाच्या अनुभवांनी पुकारलेल्या विद्रोहाला बुध्दांच्या वैश्विक करुणेचं अधिष्ठानं आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा तत्वनिष्ठ मूलगामी

"द्रष्टेपण आहे
मला हवाय
माझा समकालीन तोंडवळा
समष्टीच्या ग्लोबल कल्लोळात
अम्लान करुणेच्या
अनाहत आवाजात"

(मी भिडवू पाहतेय ...पृ.४८)

अशी प्रज्ञा लोखंडे यांची कविता समष्टीच्या व्यापकतेला केंद्रबिंदू मानून समग्राशी डोळा भिडऊ पाहण्याची हिंमत व्यक्त करते. हे या कवितेचे विशेष आहे.

## तात्पर्य

प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेचा रुपबंधात्मक कल मुळात स्त्री वेदनेशी निगडीत आहे. स्त्री भावविश्व साकारताना त्यांची कविता समाजजीवनातील काही महत्वाच्या घटनांकडेही चिकित्सक वृत्तीने पाहते. प्रज्ञा लोखंडे यांची कविता स्त्री दुःखाला फुटलेल्या नव्या पालव्यांचा शोध घेते. इथल्या स्त्रींचं आयुष्य हेच कवयित्रीच्या विचारप्रक्रियेचे स्त्रोत आहे. त्यांच्या कवितांमधून स्त्रीच्या वाटयाला येणारे पारंपरिक जग´ आणि तिच्या कक्षेबाहेरील नवे जग यामधील आकांक्षांचा ताण, घुसमट, प्रेमं सबंधातला आणि नातेसंबंध विषयीचा भ्रमनिरास, निखळ स्त्रीवादाकडे होत चाललेला कवयित्रीचा प्रवास-अशी आशयसुत्रे व्यक्त करुन आणि समाज संबध्द व्यक्तींना मिथकांच्या रुपात पाहून नवी शब्दकळा आणि ओघवती लय यांच्याद्वारे आपल्या कवितेचे एक नवे वेगळे वळण प्रज्ञा लोखंडे यांनी सूचित केले आहे. त्यांच्या कवितांमध्ये दलित स्त्रीच्या अनुभवाच्या कविता, निखळ आणि प्रखर स्त्रीवादातून लिहिलेल्या कविता, निसर्गरुपे आणि स्त्रीच्या अस्तित्वाची अवस्था यात एकरुपता पाहणाऱ्या कविता, व्यक्तीगत अनुभवांना समष्टीच्या अनुभवांमध्ये रुपांतरीत करणाऱ्या कविता, सर्जनशीलता आणि विचारप्रणाली यांच्यातील सीमारेषा पार करुन कविता मूल्य प्राप्त झालेल्या कविता आणि एकूणच सर्वच कवितांना वैचारिक चिंतनशील कवितेचा प्राप्त झालेला घाट अशी विविध परिमाणे आहेत.

विशिष्ट समाजसंबध्द स्त्री जाणिवांचा आविष्कार हे त्यांच्या काव्यसंग्रहांतील आशयसूत्र आहे. त्याचप्रमाणे एकूणच विशिष्ट धर्म, संस्कृती, वर्ण, वंश जात, देश-काल-परिस्थिती यांच्या अतीत अशा सार्वत्रिक आणि सार्वकालीन पुरुषसत्ताक अधिसत्तेखालच्या स्त्री जाणीवांचा भेदक आविष्कार हे देखील प्रज्ञा लोखंडे यांच्या काव्यसंग्रहाचे वैशिष्टय आहे. तसेच आणखी एक प्रक्रिया त्यांच्या काव्यलेखनातून घडली आहे. जल, परावर्तित प्रकाश, डोंगर, दऱ्या पृथ्वीच्या पोटातला धगधगता तप्त लाव्हा, जडशीळ हवा, उन-पाऊस, अनेक वेदनांचा पाऊस, पौरुषेय-अपौरुषेय नसलेला पाउस, जिवंत मातीखालचं प्रियदर्शित्व, मातीचा येणारा अपार वास, आकाशाचा तुडंबपट्टा, पाण्याची लकाकती खेच, लवथवणारी नदी, झेपावणारं सजीव चांदणं, विभोर जमीनीला लगटून असणारं निर्वासित नातं, इत्यादी निसर्गबध्द प्रतिमा घटकांद्वारे कवयित्रीने भावावस्था, अस्तित्वावस्था साकार करुन कवयित्रीने आपल्या अस्तित्वाचाच भाग बनवले आहे. निसर्गात देखील अभावग्रस्त

स्त्रियांच असल्याचा प्रत्यय या काव्यसंग्रहातून येतो. पर्यावरणाच्या विस्तृत संदर्भात, परिप्रेक्ष्यात कवयित्रीचे अनुभव या ठिकाणी काव्यरुपात साकार झाले आहेत.

प्रज्ञा लोखंडे यांचे सजग भान ऐतिहासिक, पौराणिक व समकालीन घटनांचे नानाविध संदर्भ घेऊन येते. सामाजिक सांस्कृतिक वस्तुस्थितील अंतर्विरोध अत्यंत तरल संवेदनेच्या पातळीवर या कवितांमधून समर्थपणे अभिव्यक्त होतो.

शब्दकळा, प्रतिमा, प्रतीके, मिथके यांचे प्रज्ञा लोखंडे यांनी अर्थपूर्ण उपयोजन केलेले आहे. प्रज्ञा लोखंडे यांचे लिहिणे लयदार आहे. कवितेत दोन लयी आढळतात. एक अंतर्गत लय आणि दुसरी दर्शनी लय. दर्शनी लय पुष्कळ कवितांतून आढळते पण अंतर्गत लय मात्र क्वचितच प्रत्ययाला येते. हीच त्यांची वैशिष्टयपूर्ण काव्यशैली आहे. प्रज्ञा लोखंडे यांच्या काव्यसंग्रहांना वैचारिकतेचे आणि चिंतनशीलतेचे प्रभावी परिमाण लाभले आहे. पुरुषसत्ताक विविध व्यवस्थानां प्रश्न विचारण्याची कवयित्रीची शशैली, सम्यक म्हणजे काय? ही नैतिकता की अनैतिकता? , हा अंधार की उजेड? असे प्रश्न उपस्थित करण्याची शशैली वास्तव घटना आणि त्यातून ध्वनित होणारी विचारसूत्रे यांना एकत्र बांधून दीर्घ कवितेचा अनुभव पेलण्याची क्षमता, विचार प्रक्षेपित करणाऱ्या प्रतिमा, स्वसमाजसंबध्द पारंपरिक मिथकांना त्यांच्या पारंपारिक अर्थापासून वेगळे करुन वास्तव अनुभवसूत्र साकारण्याची या कवयित्रीची व तिच्या कवितांची वृत्ती या वैशिष्टयांमुळे या कवितांची वैचारिक चिंतनपरता अधिक गहिरी होताना दिसते.

समकालीन कवयित्रींच्या भावविश्वाला फाटा देऊन शतकाचं दु:ख उजागर करणारी अशी प्रज्ञा लोखंडे यांची कविता आहे. म्हणूनच आधुनिक मराठी कवयित्रींमध्ये प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेचे अतिशय वेगळे आणि महत्वपूण्र स्थान आहे.

## निष्कर्ष :

१. स्त्री विश्वाचे वास्तवचित्रण प्रज्ञा लोखंडे यांनी केलेले आहे.

२. स्त्री–पुरुष नातेसंबंधातील फोलपणा आणि पुरुषी भोगवृत्ती कवयित्रीने परिणामकारक मांडली आहे.

३. दलित स्त्रीवादी संकल्पना साकारतनाच सम्यक परिवर्तना ची दिशा या कवितेत सापडते.

४. आधुनिक मराठी कवयित्रींमध्ये प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेचे अतिशय वेगळे आणि महत्वपूर्ण स्थान आहे.

## संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १) डॉ. अश्विनी धोंगडे | – | 'स्त्रीवादी समीक्षा स्वरुप आणि उपयोजन' दिलीपराज प्रकाशन, पुणे,प्रथमावृत्ती १९९३ पृ.४५ |
| २) तत्रैव | – | पृ. १०८ |
| ३) शारदा | – | 'स्त्रीवादः सर्वांगण परिपूर्ण तत्वज्ञान नव्हे.'शब्दालय प्रकाशन दिवाळी अंक १९८३ श्रीरामपूर– पृ.२७ |
| ४) प्रा.जयश्री कुलकर्णी | – | 'रुची' ग्रंथाली वाचक चळवळ दिवाळी अंक, ऑक्टोबर –नोव्हेबर २००८ पृ. ६६ |